मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# संभाव्य पाणीटंचाई टाळण्यासाठी कडक नियमावली

## सांडपाणी प्रक्रिया नसल्यास कमर्शियल इमारतींचा पाणीपुरवठा बंद




**पिंपरी | प्रतिनिधी**

संभाव्य पाणीटंचाई टाळण्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने कडक नियमावली केली आहे. पंपाद्वारे थेट लाईन वरील पाणी खेचण्यास बंदी केली असून असे आढळल्यास कारवाई, अनधिकृत कनेक्शन वर कडक कारवाई, रेन वॉटर हार्वेस्टिंगची देखभाल करणे, नवीन पाणी पुरवठा कनेक्शनसाठी पुढील दोन महिने स्थगिती, सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा नसणाऱ्या व्यापारी वसाहती मधील पाणी पुरवठा थांबविण्याची शक्यता, गाड्या, रस्ते धुण्यासाठी पिण्याच्या पाणी वापरण्यास बंदी घालण्यात आली आहे.

पिंपरी चिंचवड शहरात गेल्या काही आठवड्यापासून नागरिकांकडून पाण्याची मागणी वाढत आहे.तर दुसरीकडे संभाव्य पाणी टंचाईचा सामना करावा लागत आहे. दरम्यान सद्यस्थितीत जुलै पर्यंत पुरेल एवढाच पाणी साठा धरणात उपलब्ध आहे. शहरातील बोअरवेलचे पाणी देखील आटले आहे.त्यात टँकरचे दरही दिवसेंदिवस वाढत आहेत. सोसायट्यामधील सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा देखील बंद आहेत, अनधिकृत नळ कनेक्शन वाढले आहेत. शुद्ध पाण्याचा गाड्या धुण्यासाठी वापर केला जात आहे. या सर्व गोष्टीना आला आला घालण्यासाठी आणि नागरिकांना पावसाळ्यापर्यंत शुद्ध पाणी देण्यासाठी महानगरपालिकेच्या वतीने महत्वाच्या उपाय योजना राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

पिंपरी चिंचवड शहराची लोकसंख्या २०११ साली १७ लाख होती तीच आज ३५ लाख झाली आहे. परंतु पाणी पुरवठा फक्त ३५ % ने वाढला आहे. तरी देखील महापालिकेच्या वतीने नागरिकांना वर्षभर सुरळीत पाणी पुरवठा करण्यात येत आहे. परंतु अनधिकृत पाणी वापरामुळे उन्हाळ्याच्या दिवसात पाणीपुरवठा अडथळा निर्माण होतो यासाठी महापालिकेच्या वतीने महत्वाच्या उपाय योजना आखण्यात आल्या आहेत. यामध्ये पंपाद्वारे थेट लाईन वरील पाणी खेचण्यास बंदी व असे आढळल्यास कारवाई, अनधिकृत कनेक्शन वर कडक कारवाई, रेन वॉटर हार्वेस्टिंगची देखभाल करणे, नवीन पाणी पुरवठा कनेक्शन साठी पुढील दोन महिने स्थगिती, सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा नसणाऱ्या व्यापारी वसाहती मधील पाणी पुरवठा थांबविण्याची शक्यता, गाड्या, रस्ते धुण्यासाठी पिण्याच्या पाणी वापरण्यास बंदी घालण्यात आली आहे.

### पाणी पुरवठा विभागामार्फत होणार तपासणी..

» महानगरपालिकेच्या पाईप लाईनवर थेट पंप लावून पाणी खेचणाऱ्या विरोधात कारवाई होणार आहे. कारवाई नंतर पाणी खेचताना दिसल्यास नळ कनेक्शन बंद करणार आहे. बांधकाम साईट्स, कार वॉशिंग सेंटर, यांची तपासणी होणार आहे. सांडपाणी प्रक्रिया यंत्रणेच्या माध्यमातून निर्मित पाण्याचा वापर न करणाऱ्या मॉल व सोसायट्यावर कारवाई होणार असून, पिण्याच्या पाण्याने गाडी व रस्ते धुणाऱ्यांवर देखील कारवाई करण्यात येणार आहे.

> शहरातील वाढती लोकसंख्या लक्षात घेऊन पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने नागरिकांना शुद्ध पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यात येत आहे. उन्हाळ्याचे दिवस असल्याने पाणी नागरिकांनी पाण्याचा अपव्यय टाळून महापालिकेला सहकार्य करावे.
>
> **- प्रदीप जांभळे पाटील, प्रभारी आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका.**

---

# महापालिकेत 15 मिनिटांत नागरिक, कर्मचारी सुरक्षित बाहेर

## युद्धजन्य परिस्थिती हाताळण्यासाठी आपत्ती व्यवस्थापन यंत्रणांची तपासणी

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमध्ये धमाक्यांचा आवाज... सर्वत्र धुरांचे लोळ... आपत्ती व्यवस्थापन यंत्रणांचे फोन... भोंग्यांचा आवाज... कर्मचाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण... सर्वत्र धावाधाव... काहीतरी संकट आले म्हणून म्हणून सुरक्षा यंत्रणेची चक्रे तत्काळ फिरली... आणि अग्निशामक विभागाचे पथक पाच मिनिटांत पोहोचले... कर्मचारी, नागरिकांना सुरक्षितपणे इमारतीबाहेर काढण्यात आले. १५ मिनिटांत स्वसंरक्षण सराव (मॉक ड्रिल) यशस्वी पार पडले.

युद्धजन्य परिस्थितीमध्ये शहरातील संकट व्यवस्थापन यंत्रणा सक्षम ठेवणे, नागरिकांमध्ये जागरुकता निर्माण करण्यासाठी पिंपरी-चिंचवड महापालिका मुख्य इमारतीमध्ये बुधवारी मॉक ड्रिल घेण्यात आले. चार वाजता भोंगा वाजला. महापालिका इमारतीच्या चौथ्या मजल्यावर धूर पसरला असून, काही लोक जखमी झाले आहेत. काही जण अडकले असल्याची माहिती देण्यात आली. त्यानुसार पोलीस आणि अग्निशमन दलाच्या



जवानांनी इमारतीमधून सर्वांना बाहेर काढले. सर्व जण बाहेर आल्यानंतर जवानांनी प्रत्येक दालनात जाऊन कोणी अडकले नसल्याची खात्री केली. त्यानंतर इमारतीमधून चार नागरिकांना 'ब्रांटो स्काय लिफ्ट'च्या मदतीने रेस्क्यू करण्यात आले. दोघांना रोप लावून रेस्क्यू केले. तर, चौघांना स्ट्रेचरवरून रेस्क्यू करत रुग्णवाहिकेतून रुग्णालयाच्या दिशेने रवाना केले.

या मॉक ड्रिलमध्ये अग्निशमन विभागाच्या चार बंबांसह २० अधिकारी, कर्मचारी, चार रुग्णवाहिका, १६ कर्मचारी, सुरक्षा विभागाचे ५२ कर्मचारी, पोलीस अधिकारी, कर्मचारी असे ३७ जण तसेच वाहतूक पोलिसांचे २४ जण, आपत्ती व्यवस्थापन विभागाचे एक अधिकारी, एनसीसी व राष्ट्रीय सेवा योजनेचे ४६ स्वयंसेवक, १८ आपदा मित्र सहभागी झाले होते.

> संकट अचानक येते. त्यामुळे मॉक ड्रिलच्या माध्यमातून यंत्रणांचे प्रशिक्षण आणि सज्जता वाढविणे अत्यंत आवश्यक आहे. भविष्यात अशा अधिकाधिक मॉक ड्रिल उपक्रमांचे आयोजन केले जाईल. १५ मिनिटांत मॉक ड्रिल यशस्वीपणे पार पडले.
>
> **- तृप्ती सांडभोर, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी-चिंचवड महापालिका.**

# पुणे महापालिकेत भोंगाच नाही

## अग्निशामक यंत्रणेतही सुधारणा आवश्यक, मॉक ड्रिलमध्ये त्रुटी समोर

**पुणे | प्रतिनिधी**

भारत-पाकिस्तानदरम्यान तयार झालेल्या युद्धजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर काय खबरदारी घ्यावी, यासाठी महापालिकेच्या मुख्य इमारतीमध्ये मॉक ड्रिल घेण्यात आले. या मॉक ड्रिलमुळे महापालिकेच्या यंत्रणेतील अनेक त्रुटी समोर आल्या. महापालिकेच्या आवारात यंत्रणांना दक्ष करण्यासाठी भोंगा नसल्याचे समोर आले. इतकेच नव्हे, तर अग्निशामक यंत्रणादेखील योग्य पद्धतीने काम करत नसल्याचे स्पष्ट झाले.

सध्या भारत आणि पाकिस्तानमध्ये सुरू असलेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर युद्ध झाल्यास नक्की काय करावे, नागरिकांची काळजी कशी घ्यावी, यासाठी केंद्र सरकारने राज्यातील प्रमुख शहरांमध्ये मॉक ड्रिल घेण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार महापालिकेच्या मुख्य भवनाच्या इमारतीमध्ये बुधवारी चार वाजण्याच्या सुमारास मॉक ड्रिल झाले. यामध्ये नागरी संरक्षण दल, अग्निशामक दल, वैद्यकीय अधिकारी, पोलिस विभाग, महापालिकेचा सुरक्षा विभाग, तसेच संकट व्यवस्थापन विभागाने सहभाग घेतला.



> युद्धजन्य स्थितीच्या पार्श्वभूमीवर महापालिकेत मॉक ड्रिल घेण्यात आले. या वेळी काही यंत्रणा काम करीत नसल्याचे दिसून आले. भविष्यात मोठी दुर्घटना घडू नये, यासाठी सर्व यंत्रणांची पाहणी करून त्रुटी दूर केल्या जातील.
> **- ओमप्रकाश दिवटे, अतिरिक्त आयुक्त, पुणे महापालिका.**

महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त ओमप्रकाश दिवटे यांनी मॉक ड्रिलबाबत सर्व उपस्थित कर्मचारी, अधिकारी, तसेच महापालिकेत कामानिमित्त आलेल्या नागरिकांना सविस्तर माहिती दिली. संकटकालीन स्थिती निर्माण झाल्यास काय करावे, कशी काळजी घ्यावी, सर्व यंत्रणांना कसे सहकार्य करावे याबाबत मार्गदर्शन केले. मॉक ड्रिल झाल्यानंतर त्यामध्ये अनेक त्रुटी असल्याचे समोर आले. महापालिकेत दररोज कामानिमित्त येणाऱ्या नागरिकांची संख्या मोठी असते. तसेच, महापालिकेत विविध विभागांमध्ये शेकडो अधिकारी, कर्मचारी काम करतात. अचानक आग लागली, तर सर्वांना सूचना मिळावी, यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजाविणारा भोंगाच महापालिकेकडे नाही.

दुर्घटना घडल्यास योग्य समन्वय ठेवून नागरिकांना महापालिकेच्या बाहेर सुरक्षितपणे काढण्यासाठी पालिकेच्या सुरक्षा रक्षकांकडे संपर्क यंत्रणा (वॉकीटॉकी) नसल्याचे यानिमित्त समोर आले. सुरक्षारक्षकांना एकमेकांशी संपर्क करण्यासाठी वॉकीटॉकी द्यावेत, अशी मागणी गेले तीन वर्षांपासून केली जात असून, त्याकडे दुर्लक्ष केले जात असल्याचे समोर आले. अनेक कार्यालयांचे नूतनीकरण करण्यात आल्याने अधिकाऱ्यांच्या कार्यालयातील स्प्रिंकल बंद पडलेले आहेत.

# पालिका निवडणुकीत राजकीय समीकरणे बदलणार

## महापालिकेच्या निवडणुकीत राजकीय समीकरणे बदलणार : पुणे पॅटर्न पुन्हा होणार का?

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महापालिकेत २००७ साली काँग्रेसचे नेते सुरेश कलमाडी यांनी सत्तेपासून दूर ठेवण्यासाठी राष्ट्रवादीचे नेते अजित पवार यांनी भाजप आणि शिवसेनेला बरोबर घेऊन पुण्यात सत्ता आणली होती. हा पुणे पॅटर्न राज्यात गाजला होता. आता राज्यातील सरकारमध्ये भाजपबरोबर शिंदेसेना आणि राष्ट्रवादीचा अजित पवार गट सहभागी झाला आहे. त्यामुळे आगामी पुणे महापालिकेच्या निवडणुकीत राजकीय समीकरणे बदलणार आहेत. पुणे महापालिकेतही हा पुणे पॅटर्न पुन्हा होणार का? असा सवाल उपस्थित केला जात आहे.

पुणे महापालिकेची २००७ साली निवडणूक झाली. त्यावेळी काँग्रेसचे नेते सुरेश कलमाडी आणि राष्ट्रवादीचे नेते अजित पवार यांच्यातून विस्तवही जात नव्हता. त्यामुळे सुरेश कलमाडी यांना काँग्रेसमधील सत्तेपासून रोखण्यासाठी राष्ट्रवादीचे नेते अजित पवार यांनी मोठी खेळी खेळली. त्यावेळी भाजपचे नेते विनोद तावडे आणि शिवसेनेचे तत्कालीन पुणे जिल्हा संपर्कप्रमुख अरविंद सावंत यांना विश्वासात घेतले. पुणे महापालिकेत काँग्रेसला सत्तेपासून दूर ठेवण्यासाठी शिवसेना, भाजपला बरोबर घेऊन पुणे पॅटर्न तयार केला होता. राष्ट्रवादीच्या राजलक्ष्मी भोसले पुण्याचा महापौर झाल्या होत्या. शिवसेनेला उपमहापौरपद आणि स्थायी समितीचे अध्यक्षपद दिले होते.

भाजपला स्थायी समितीचे अध्यक्षपद दिले होते. त्यावेळी राज्याच्या आणि देशाच्या राजकारणात हा पुणे पॅटर्न मोठा गाजला होता. त्यानंतर विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर हा पुणे पॅटर्न तोडण्यात आला होता. त्यानंतर पुणे महापालिकेत काँग्रेस आणि राष्ट्रवादी एकत्र आली. त्यानंतर २०१२च्या महापालिका निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेसची सत्ता आली. आघाडीने पाच वर्षे काम केले.



### महाविकास आघाडी विरुद्ध पुणे पॅटर्न

**» शिवसेनेमध्ये फूट पडली आहे. त्यामुळे शिंदेसेना आणि उद्धवसेना असे दोन गट पडले आहेत. आता राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडली आहे. त्यामुळे एक गट राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांच्या बरोबर तर दुसरा गट उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या बरोबर जाणार आहे. काँग्रेस पक्ष उद्धवसेना आणि राष्ट्रवादीच्या शरद पवार यांच्या बरोबर आहे. त्यामुळे पुणे महापालिकेची आगामी निवडणूक महाविकास आघाडी आणि भाजप, शिंदेसेना आणि राष्ट्रवादीच्या अजित पवार गट या पुणे पॅटर्न विरुद्ध होण्याची दाट शक्यता आहे.**

२०१७च्या निवडणुकीत पालिकेत भाजपची एकहाती सत्ता आली. त्यानंतर झालेल्या विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादीचे अजित पवार आणि भाजपचे देवेंद्र फडणवीस यांनी पहाटे शपथविधी केला; पण हे बंड राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांनी मोडून काढले. त्यानंतर भाजपला सत्तेपासून दूर ठेवण्यासाठी शिवसेना, काँग्रेस आणि राष्ट्रवादीने एकत्र येऊन महाविकास आघाडीचे सरकार राज्यात सत्तेवर आले.

अडीच वर्षांनंतर शिवसेनेचे ४० आमदार फुटले. त्यानंतर एकनाथ शिंदे मुख्यमंत्री आणि देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री बनले. या सरकारला एक वर्ष पूर्ण झाले असतानाच राष्ट्रवादीचे नेते अजित पवार हे २९ आमदारांसह शिंदेसेना आणि भाजप सरकारमध्ये सहभागी झाले. पुणे महापालिकेत सध्या प्रशासक राज आहे. आता राज्यातही पुणे पॅटर्न झाला आहे. त्यामुळे पालिका निवडणूक भाजप स्वतंत्र लढविणार का?, शिंदेसेना आणि राष्ट्रवादीच्या अजित पवार गटाला बरोबर घेऊन पुणे पॅटर्न म्हणून सामोरे जाणार का, असा सवाल उपस्थित केला जात आहे.

# बेकायदा अनाथाश्रम, बालगृहे पोलिसांच्या रडारवर

## शारीरिक, मानसिक अन् लैंगिक शोषणाच्या वाढत्या घटनांमुळे कारवाईचा इशारा

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरासह राज्यातील अनेक भागांत बेकायदा चालवल्या जाणाऱ्या बालसंगोपन संस्था, अनाथाश्रमे आणि वसतिगृहे आता पोलिसांच्या रडारवर आली आहेत. महिला व बालविकास विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्याकडून प्राप्त झालेल्या पत्राच्या पार्श्वभूमीवर, शहरातील सर्व पोलिस ठाण्यांना त्यांच्या हद्दीतील बालकांच्या संस्थांची सखोल तपासणी करण्याचे आदेश देण्यात आले असून, त्यानुसार कारवाई सुरू करण्यात आली आहे

राज्यात अनेक बालसंगोपन संस्था, अनाथाश्रम आणि वसतिगृहे कार्यरत आहेत. यातील काही अनधिकृत संस्थांमध्ये बालकांवर शारीरिक, मानसिक आणि लैंगिक शोषणाच्या गंभीर घटना समोर आल्या आहेत. ही बाब बाल न्याय (मुलांचे काळजी व संरक्षण) अधिनियम, 2015 व सुधारित अधिनियम, 2021 मधील तरतुदींनुसार अत्यंत गंभीर स्वरूपाची असून, कायद्याचे सरळ उल्लंघन करणारी आहे.




### पोलिसांच्या मदतीने कारवाई

» खडवली या भागात अवैधरित्या चालविल्या जाणाऱ्या बालकांच्या निवासी संस्थेत बालिकांवर लैंगिक अत्याचार करण्यात आले. याबाबतची तक्रार मचाईल्ड हेल्प लाईनफवर प्राप्त झाल्यानंतर जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयाच्या पथकाने पोलिसांच्या मदतीने ही कारवाई केली.

या पार्श्वभूमीवर राज्यभरातील सर्वच संस्थांची तपासणी करण्याचे निर्देश निर्गमित करण्यात आले असून, त्यानुसार पिंपरी-चिंचवड शहरातील संस्थांची प्रत्यक्ष पाहणी सुरू आहे. प्रत्येक पोलिस ठाण्याला त्यांच्या हद्दीतील संस्थांना भेट देऊन त्यांचे नोंदणी प्रमाणपत्र, बालकांची उपस्थिती, उपलब्ध सुविधा यांची तपासणी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. अनधिकृत संस्था आढळल्यास थेट गुन्हे नोंदवून कठोर कायदेशीर कारवाई करण्याचे स्पष्ट निर्देशही देण्यात आले आहेत.

अवैधरित्या चालविल्या जाणाऱ्या बालकांच्या निवासी संस्थेत बालिकांवर लैंगिक अत्याचार करण्यात आले. याबाबतची तक्रार मचाईल्ड हेल्प लाईनफवर प्राप्त झाल्यानंतर जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयाच्या पथकाने कारवाई केली.

### या कारवाईमुळे होणारे फायदे

- बालकांचे शोषण रोखले जाईल
- फक्त नोंदणीकृत संस्थांनाच परवानगी मिळेल
- पालक व समाजात जागरूकता वाढेल
- भोंदू महाराज व संस्थाचालकांचा पर्दाफाश होईल
- बालकांच्या हक्कांचे संरक्षण सुनिश्चित होईल
- बाल न्याय कायद्याची अंमलबजावणी प्रभावीपणे होईल

### सद्यस्थितीत कारवाई न झाल्याचे दुष्परिणाम

- बालकांचे शोषण सुरूच
- गुन्हेगार मोकाट फिरत आहेत
- बालकांच्या आयुष्यात अंधार
- अधिकृत संस्थांचे खच्चीकरण
- समाजात प्रशासनावरील विश्वास कमी
- कायद्याची अवहेलना व शासन यंत्रणेची विश्वासार्हता धोक्यात

# पिंपरी-चिंचवड शहरातील इतर अनधिकृत बांधकामांचे काय?

## पुन्हा त्या भागातीलच अनधिकृत प्रार्थनास्थळांना महापालिकेने नोटिसा बजावल्या

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेने कुदळवाडी भागातील भंगाराच्या अनधिकृत पत्राशेड, बांधकामे तसेच, लघुउद्योग आणि इतर आस्थापनांवर धडक कारवाई करीत ती जमीनदोस्त केली. त्यानंतर पुन्हा त्या भागातीलच अनधिकृत प्रार्थनास्थळांना महापालिकेने नोटिसा बजावल्या आहेत.

महापालिकेने शहरातील इतर भागांतील अनधिकृत बांधकामांकडे कानाडोळा करीत कारवाईसाठी एकाच भागावर लक्ष्य केंद्रित केल्याने शहरात उलटसुलट चर्चेला ऊत आला आहे. कारवाईत भेदभाव केला जात असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे

शहरात दोन लाखांपेक्षा अधिक अनधिकृत बांधकामे आहेत. दिवसेंदिवस त्यात वाढच होत आहे. अशा बांधकामांमुळे तसेच, पत्राशेडमुळे महापालिकेवर नागरी सुविधांचा अतिरिक्त ताण येतो. शहर विद्रुप होते. बांधकाम करताना रस्त्यासाठी पुरेशी जागा सोडली नसल्याने आग, पूर अशा आपत्कालीन परिस्थितीत मोठी दुर्घटना घडण्याचा धोका निर्माण होतो.

अनधिकृत बांधकामांवर कारवाईचे न्यायालयाचे स्पष्ट आदेश आहेत. मात्र, राजकीय दबाव, क्षेत्रीय कार्यालयाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या अर्थपूर्ण संबंधांमुळे कारवाईकडे दुर्लक्ष होत असल्याचे बोलले जात आहे.



### शहरात दोन लाख अनधिकृत बांधकामे

» पिंपरी-चिंचवड शहरातील सांगवी, पिंपळे गुरव, दापोडी, कासारवाडी, आकुर्डी, दिघी, भोसरी, थेरगाव, रहाटणी, काळेवाडी, वाल्हेकरवाडी, तळवडे आदी भागांत मोठ्या प्रमाणात अनधिकृत बांधकामे झाली आहेत. नदीकडेला, हरितपट्टा, आरक्षणाच्या जागा आदी ठिकाणी बांधकाम केले जाते. केवळ तीन ते चार महिन्यांत तीन मजली इमारत बांधून रंग देऊन तयार केली जाते. बाजारभावापेक्षा कमी दराने त्या सदनिका विकल्या जातात. शहरात दोन लाखांपेक्षा अधिक अनधिकृत बांधकामे असल्याचे सूत्रांनी सांगितले. अशा बांधकामांवर महापालिकेकडून मालमत्ताकरावर दोनशेपट शास्तीकर लावला जातो.

> शहरात विविध धर्मियांची हजारो प्रार्थनास्थळे आहेत. त्यात अनेक वर्षांपासून नागरिकांकडून प्रार्थना तसेच, धार्मिक कार्यक्रम आयोजित केले जातात. असे असताना आता त्या प्रार्थनास्थळांना अनधिकृत ठरवून कारवाई करणे अयोग्य आहे. आरक्षणास बाधित असलेल्या प्रार्थनास्थळाचे बांधकाम काढून घेण्यास नागरिक तयार आहेत. विकासासाठी नागरिकांचे सहकार्य आहे. प्रार्थनास्थळांसाठी राज्य शासनाने विशेष नियम करून ती अधिकृत करावीत. महापालिका कारवाई करताना भेदभाव करीत असल्याचे दिसत येत आहे. तसेच, शहरात पुन्हा अनधिकृत प्रार्थनास्थळ तयार होऊ नये, यासाठी महापालिकेने दक्षता घ्यावी.
>
> **- मारुती भापकर, सामाजिक कार्यकर्ते**

> शहरातील अनधिकृत बांधकामे, पत्राशेड आणि अतिक्रमणांवर नियमितपणे कारवाई केली जाते. आरक्षणातील बांधकामेही पाडली जातात. कारवाईपूर्वी संबंधित अनधिकृत बांधकामधारकांना नोटीस बजावली जाते. बांधकाम काढून घेण्यास त्यांना मुदत दिली जाते. कारवाईत कोणताही भेदभाव केला जात नाही.
>
> **- मनोज लोणकर, उपायुक्त, महापालिका**

# एक वेगळे अधिवेशन केंद्र सरकारने घ्यावे

## खासदार सुप्रिया सुळे : पुढील दोन आठवडे सरकारवर टीका करणार नाही

**पुणे | प्रतिनिधी**

केंद्र शासनाने बोलावलेल्या सर्व राजकीय पक्षांच्या बैठकीला आम्ही गेलो होतो त्यावेळी हा भारतावर हल्ला झाला म्हणून आम्ही सर्व सरकारबरोबर आहोत. पुढील दोन आठवडे आम्ही सरकारवर टीका करणार नाही. एक वेगळे अधिवेशन सरकारने घ्यावे. भारताची शांतता ऐक्य जपण्याचे ही सर्वांची जबाबदारी आहे. भारत सरकार काय निर्णय घेत आहेत याची आम्ही वाट पाहत आहोत. भारत पाकिस्तानमध्ये वाढत असलेल्या ताणावाबद्दल खासदार सुप्रिया सुळे यांनी सांगितले.

सासवड (ता पुरंदर) येथे उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयामध्ये विमानतळ प्रकल्पबाधित शेतकऱ्यांवर झालेल्या गुन्ह्यांसंदर्भात पोलीस अधीक्षक पंकज देशमुख यांच्यासोबत बैठकीचे आयोजन करण्यात आले होते या बैठकीनंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना सुळे बोलत होत्या. यावेळी शिष्टमंडळामध्ये माजी जिल्हा परिषद सदस्य सुदाम इंगळे, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष माणिक झेंडे पाटील, पुष्कराज जाधव, मनीष हगवणे, कुंभारवळणच्या सरपंच मंजुषा गायकवाड, चेतन मेमाणे, राजाभाऊ कुंभारकर, देविदास कामठे, महादेव टिळेकर, विजय गांजुरे, माऊली मेमाने, मुरलीधर झुरंगे, अमोल कामठे, तुषार झुरंगे उपस्थित होते.

महाराष्ट्रातल्या कुठल्याच विकासाच्या प्रकल्पाला आमचा विरोध नाही परंतु विकास अशा ठिकाणी व्हावा ज्या ठिकाणी शेतकऱ्यांना विश्वासात घेऊनच प्रकल्प व्हावेत त्याचबरोबर शेवटच्या शेतकऱ्याचे जोपर्यंत समाधान होत नाही तोपर्यंत कुठल्याही प्रकारचे भूसंपादन करण्यात येऊ नये. ही भूमिका आमची पहिल्यापासून आहे मग तो विमानतळ किंवा रिंग रोडचा प्रश्न असो कोणत्याही शेतकऱ्यावर अन्याय होणार नाही याची खबरदारी सरकारने घेतली पाहिजे.

भूसंपादन अधिकारी यांनी शेतकऱ्यांना दोन आठवड्यांचा वेळ दिला आहे यामध्ये कृती समिती स्थापन करून जो काही शेतकऱ्यांचा विरोध असेल किंवा आणखी काही पर्याय असतील ते सरकारला पोचवले जातील तोपर्यंत कुठलाही सर्व्हे करण्यात येऊ नये, असे सुळेंनी स्पष्ट केले.

भारतावर हल्ला झाला म्हणून आम्ही सर्व सरकारबरोबर आहोत. पुढील दोन आठवडे आम्ही सरकारवर टीका करणार नाही. एक वेगळे अधिवेशन सरकारने घ्यावे. भारताची शांतता ऐक्य जपण्याचे ही सर्वांची जबाबदारी आहे. भारत सरकार काय निर्णय घेत आहेत याची आम्ही वाट पाहत आहोत. भारत पाकिस्तानमध्ये वाढत असलेल्या ताणावाबद्दल खासदार सुप्रिया सुळे यांनी सांगितले.



### कृती समिती स्थापन करून चर्चा करणे गरजेचे

» काही आंदोलकांच्यावर गुन्हे दाखल झाले असून यामध्ये पोलीस बसून योग्य तो निर्णय घेतील व येणाऱ्या दोन-चार दिवसांमध्ये गुन्ह्यांच्या संदर्भात विचार करतील.विमानतळाच्या प्रश्नासाठी पुरंदर वासीय म्हणून आपण सर्वांनी एकत्र आले पाहिजे. एक कृती समिती स्थापन करून सरकार बरोबर चर्चा करणे गरजेचे आहे.

### त्यांना जामीन मिळेल

» शेतकऱ्यांवर गुन्हे दाखल झाले त्यांना आजच जामीन मिळेल अशा अपेक्षा आहे. यामध्ये कोणी दहशतवादी नाही हे सर्व पुरंदरची लेकरं आहेत. त्यामुळे त्यांना लवकरात लवकर जामीन मंजूर व्हावा. सरकारने जो काही निर्णय घ्यायचा आहे तो अतिशय संवेदनशील पणे घ्यावा. सर्व पुरंदरवासीय व कृती समिती ठरली की मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री भेटणार आहोत.

### हे नेते शेतकऱ्यासोबत

» आमदार विजय शिवतारे, माजी आमदार संजय जगताप, माजी आमदार अशोक टेकवडे जिल्हा बँकेचे अध्यक्ष प्रा. दिगंबर दुर्गाडे, माजी सनदी अधिकारी संभाजी झेंडे, यांना मी सकाळी फोन केला. सर्वांनी सांगितले आम्ही शेतकरी सोबत आहोत.

> कायदेशीर बाजु समजुन सांगितली आहे. शासनाशी सुसंवाद ठेवा कुठल्याही प्रकारच्या अफवांना बळी पडू नका जे गुन्हे दाखल आहेत त्याबाबत वस्तूनिष्ठ माहिती शिष्टमंडळाला दिली आहे.
>
> **- पंकज देशमुख, पोलीस अधीक्षक**

# शहागावात असलेल्या पिराण टेकडीवर परदेशी पाहुण्यांचे आगमन

## पिराण टेकडीवरती यंदाच्या हंगामात रशिया, युरोप सह संपूर्ण जगभरातील शेकडो प्रजातीचे पक्षी दाखल झाले आहेत.

**पुणे | प्रतिनिधी**

उजनी धरणाच्या बॅक वॉटर म्हणजेच फुगवट्याजवळ मौजे शहा (इंदापूर) या गावात असलेली पिराण टेकडी ही शेकडो प्रजातीच्या परदेशातून आलेल्या पक्षांची गोकुळ नगरी म्हणून ओळखली जाते. त्याच पिराण टेकडीवरती यंदाच्या हंगामात परदेशातून अनेक पक्षांचे आगमन झाले असून, यामध्ये रशिया, युरोप सह संपूर्ण जगभरातील शेकडो प्रजातीचे पक्षी प्रजननासाठी दाखल झाले आहेत. त्यामुळे पुणे, सोलापूर, अहिल्यानगर सह राज्यातील पक्षीप्रेमींना पक्षी निरीक्षणासाठी व पर्यटनासाठी आनंदाची पर्वणी निर्माण झाली आहे.

पुणे आणि सोलापूर जिल्ह्याच्या सीमेवर उजनी बॅक वॉटरमध्ये मौजे शहा या गावामध्ये असलेला उजनीचा अथांग जलाशय आणि या जलाशयातून पाणी कमी झाल्यावर पाण्यातून वरती येणारी पिराण टेकडी ही स्थलांतरित पक्ष्यांसाठी स्वर्ग मानली जाते. या टेकडीवरती हजारो किलोमीटर चा प्रवास पार करून युरोप, रशिया, मध्य आशिया, आफ्रिका, ब्रह्मदेश तसेच भारतीय उपखंडातील काही राज्यांमध्ये व देशांमध्ये आढळणारे अनेक पक्षी प्रजननासाठी दाखल झाले आहेत.

या पिराण टेकडी वरती सद्यस्थितीला नॉर्दर-शॉवलर हा रशिया व युरोप मधील मोठी व चपट्या टोकाची चोच असलेला पक्षी आढळत आहे. तसेच पेंटेड स्टॉर्क हा भारतातील गुलाबी पंख असलेला स्थानिक पक्षी या ठिकाणी दाखल झाला आहे. तसेच ब्लॅक टेल्ट गॉडविट (युरोप, नेदरलँड), कॉमन टील (युरेशिया), ओस्प्रे (युरोप, रशिया), व्हाईट वॅगटेल (मध्य आशिया), इंडियन स्पॉट- बिल्ड डक (भारत-स्थानिक पक्षी), रिव्हर टर्न (भारत ) स्मॉल प्रेटिकोल (भारत) बार -हेडेड गूज (तिबेट- मंगोलिया) असे अनेक पक्षी या टेकडीवरती सध्या स्थितीला वास्तव्याला आले आहेत.



> शहा हे केवळ स्थानिक नव्हे तर आंतरराष्ट्रीय पक्षांसाठी एक सुरक्षित निवासस्थान आहे. या निवासस्थानामध्ये आपणाला हजारो प्रजातीचे जगभरातून प्रजननासाठी दाखल झालेले वेगवेगळे पक्षी पाहावयाला मिळतात. यामधून पर्यावरणातील समतोल, पिराण टेकडीवरील उघड्या झालेल्या जागेचे महत्व व जैवविविधतेची गुंतवणूक स्पष्ट होते. अशा परदेशी पक्षांचे निरीक्षण व संवर्धन हे आपल्या सर्वांसाठी कर्तव्य असून उजनी बॅक वॉटरमधील शहा गावात असलेली पिराण टेकडी एक पर्यटन स्थळ म्हणून घोषित होणे काळाची गरज आहे.
>
> **- विशाल लोकरे, पक्षी निरीक्षक-शिराळ, सोलापूर**